2


# नवी मुंबई महानगरपालिका

# Navi Mumbai Municipal Corporation

पहिला माळा, बेलापूर भवन, सी.बी.डी.,
नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी क्र : ७५७ १७ ३३, ७५७ १७ २८
७५७ ४० २२
फॅक्स : ७५७ ३७ ८५

1ST. FLOOR, BELAPUR BHAVAN, C.B.D.,
NAVI MUMBAI - 400 614.
TEL. No. : 757 17 33, 757 17 28
757 40 22
FAX : 757 37 85


जा.क्र./नमुंमपा/नरवि/बा.प./ 6355
दिनांक :- १९/१० /२००२.

प्रति,
श्री महादेव पदाजी आगाम्कर व इतर-७
भूखंड क्र. - १००, सेक्टर-१४, गा.वि.यो., कोपर खैरणे,
नवी मुंबई.

नस्ती क्र.-नमुंमपा/वि.प्र.क्र.-६११/२००२

विषय :- भूखंड क्र.- १००, सेक्टर-१४, गा.वि.यो., कोपर खैरणे, नवी मुंबई या जागेत रहिवास करणासाठी बांधकाम परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- आपले वास्तुविशारद यांचा दि. २४-०६-२००२ रोजीचा अर्ज.

महोदय,

भूखंड क्र.- १००, सेक्टर-१४, गा.वि.यो., कोपर खैरणे, नवी मुंबई या जागेत रहिवास करणासाठी बांधकाम परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेस वरील संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. संदर्भाधिन जागेत रहिवास उपयोगासाठी बांधकाम परवानगी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनीयम १९४९ च्या कलम २५३ व २५४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५(१)(३) मधील तरतुदीनुसार मंजुर करण्यात येत आहे. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र सोबत नियोजित बांधकामासाठी जोडीत आहे. तसेच खाली नमुद केलेल्या बाबींची नोंद घ्यावी.

पाणी पुरवठा व मलनि:स्सारण सुविधा आवश्यक शुल्क भरणा केल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येतील.

रस्त्यावर व गटारात बांधकाम साहित्य पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. अशाप्रकारे बांधकाम साहित्य रस्त्यावर आढळून आल्यास आपणास रितसर दंड भरावा लागेल . तसेच बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबतची कार्यवाही सुध्दा करण्यात येईल याबाबतची नोंद घ्यावी.

बांधकाम सुरु असताना जागेवरील रिकामे गाळे/सदनिका यांची संरक्षणाची जबाबदारी संबंधित जमिनमालक/ भूखंडधारक/गाळेधारक यांची राहील. तसेच अर्धवट बांधलेल्या जागेचा गैरवापर होऊ नये म्हणुन संबंधित भूखंड धारकाने कुंपण भिंत बांधुन त्या ठिकाणी अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. गैरकृत्य करताना आढळल्यास संबंधितावर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

इमारत बांधकाम करणारे मजुराचे तात्पुरते निवासाकरिता (Labour Shed) भूखंडाचे हद्दीत आरोग्याच्या दृष्टीकोनातून त्यांचे तात्पुरते टॉयलेटसह सोय करणे आवश्यक आहे. त्यासाठी भूखंडाचे एका बाजूचे सामासिक अंतरात ३ मी. रुंदीचे तात्पुरती शेड्स टॉयलेट करण्यास परवानगी देणेत येत आहे. [illegible]बाबत पुरेशी व्यवस्था न केल्यास जोता लेव्हलचे पुढील काम करणेस परवानगी देता येणार नाही. तसेच भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करणेपूर्वी सदर शेड स्वखर्चाने काढून टाकणेत यावी.

कृ.म.वि. ला. ला-३
५५४ | 20.30
२००३